|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade

(NAAC RE-ACC REDITED) (3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

जा. क्र. उमवि/७-ग/जन-२८(३)/एमकेसीएल परिपत्रक/२३९२/२०१७ दिनांक:-२०/०६/२०१७

प्रति,

१) मा.प्राचार्य/प्राचार्या/संचालक,उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व,

अ) कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालये,
ब) व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालये,
क) विधी महाविद्यालये,
ड) मानसनिती व समाजविज्ञान महाविद्यालये,,
इ) अभियांत्रिकी महाविद्यालये,
ई) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
उ) शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
ऊ) मान्यताप्राप्त परिसंस्था..

२) मा. संचालक, सर्व प्रशाळा,उमवि,जळगाव.

**विषय :- ई-सुविधा योजने अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे Online प्रवेश करणे व ई-सुविधा शुल्काबाबत..**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.ईसेवा/२००६/(१९१/०६) मशि-१) दि.१९/०६/२००६

२) जा.क्र.उमवि/७-ग/MKCL/१५६५/२००९ दि.१६/०४/२००९

महोदय/महोदया,

उमवि अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना ई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार, एमकेसीएल सोबत विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून सामजंस्य करार केलेला आहे. या करिता एमकेसीएलने Digital University Portal विकसीत केलेले असून या Portal व्दारे विद्यार्थ्यांना ई-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. (http://nmuj.digitaluniversity.ac) तसेच विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी, स्पर्धात्मक परीक्षेची माहितीचा समावेश असलेले EASY Portal, एमकेसीएलद्वारा विकसित केलेले आहे. ई-सुविधा अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना कोणकोणत्या सुविधा उपलब्ध असतात याबाबतचा संपूर्ण तपशिल संदर्भीय पत्र क्रमांक २ नुसार सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आलेला आहे.

या योजनेचा विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा याकरिता शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये खालील वर्गाच्या प्रवेशित विद्यार्थ्याकडून ई-सुविधा शुल्क रू ५०/- हे संदर्भीय शासन निर्णय क्र.१ नुसार आकारण्यात यावी. विद्यार्थ्याकडून जमा केलेले ई-सुविधा शुल्क हे प्रथम वर्षाच्या पात्रता अर्जासह आणि इतर वर्गाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीसह विद्यापीठ कार्यालयात प्रथम वर्षाच्या पात्रता अर्जासोबत जमा करावे.

**१) प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य. B.Voc,B.Sc. Acturial Science (शैक्षणिक प्रशाळा), B.A MCJ.**
**२) प्रथम, द्वितीय,तृतीय व चतुर्थ वर्ष अंभियांत्रिकी. औषधनिर्माण विद्याशाखा, B.Arc., B.Tech (Cosmatic)**
**३) प्रथम व द्वितीय शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र.(B.Ed.,B.P.Ed, M.Ed, M.P.Ed-I & II , B.P.E, B.Ed. (Special))**
**४) प्रथम,द्वितीय तृतीय,चतुर्थ व पाचवे वर्ष बी.ए.एलएल.बी., प्रथम,द्वितीय व तृतीय वर्ष एल.एल.बी., L.L.M**
**५) प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष बी.एस.डब्लू.,बीबीएम.,बीबीएम-ई-कॉमर्स. बीबीए. बीसीए.**
**६) प्रथम, द्वितीय वर्ष एम.बी.एम,(कॉम्प्यूटर मॅनेजमेन्ट),एमबीएम (पर्सोनेल मॅनेजमेन्ट),**
**७) प्रथम, द्वितीय वर्ष M.B.A. व प्रथम, द्वितीय व तृतीय M.C.A. (शैक्षणिक प्रशाळा व महाविद्यालयांकरिता) M.B.A. , M.C.A.(Integrated)**
**८) प्रथम व द्वितीय वर्ष M.A.,M.Com, M.Sc,M.S.W. (शैक्षणिक प्रशाळा व महाविद्यालयांकरिता), B.F.A, M.F.A**
**९) प्रथम,द्वितीय,तृतीय व चतुर्थ वर्ष B.Tech (शैक्षणिक प्रशाळा)**
**१०) प्रथम व द्वितीय वर्ष M.E., M.Pharm व M.Tech (शैक्षणिक प्रशाळा)**

पदवी स्तरावरील प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून Online Applicaton पध्दतीने प्रवेश प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी. जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरतील त्यांची माहिती Digital College Login मधून नव्याने भरण्याची आवश्यकता राहणार नाही. महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगीनमधून विद्यार्थ्याने भरलेली माहिती जसे-विद्यार्थ्याचे नाव (इ.१२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्रावरील नाव व पदवी परीक्षेसाठीचे नाव) निवडलेला विषय,वैकल्पीक विषय,महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय आदी बाबींची माहिती तपासून व पडताळणी करुन घेण्यात यावी. उपरोक्त सर्व बाबींच्या पुर्ततेनंतर विद्यार्थ्याचा प्रथम वर्षाचा प्रवेश College Login मधून अंतीम व निश्चित (Confirm) करण्यात यावा. सदर प्रवेश मंजूर प्रवेश क्षमते इतके करावे. तसेच विद्यापीठ परिपत्रक १०/१९९८ नुसार प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याची मागील परीक्षेची संपादणूक रद्द करुन एकदाच पुनर्प्रवेश द्यावयाचा आहे. अशा विद्यार्थ्यास एकदाच पुनर्प्रवेश देण्यात यावा एखाद्या विद्यार्थ्यास दुसऱ्यांदा पुनर्प्रवेश दिल्याचे निदर्शनास आल्यास सदर पुनर्प्रवेश मान्य केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पुनर्प्रवेशीत विद्यार्थ्यांची माहिती पात्रता विभागास व परीक्षा विभागास लेखी स्वरुपात कळवावी.

(कृ.मा.प..२.)

(.२.)

तथापि, जे विद्यार्थी Online Applicaton प्रक्रियेत सहभागी होणार नाहीत त्यांची डाटा एन्ट्री त्यांना हस्तलिखित अर्जावर प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांना ऑनलाईन डिजीटल कॉलेज सॉफ्टवेअरमध्ये पूर्वीप्रमाणे आपल्या कर्मचारी वर्गाकडून विहित मुदतीत करुन घ्यावी लागेल, याची कृपया नोंद घ्यावी.

पदवी स्तरावरील प्रथम वर्ष अभ्यासक्रमास ऑनलाईन अर्ज करताना DU Portal वरील Online Application for UG/PG Courses for un-registered Students या लिंकच्या सहाय्याने विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच पदव्युत्तर स्तरावरील प्रथम वर्ष अभ्यासक्रमास ऑनलाईन अर्ज करताना DU Portal वरील Online Application for UG/PG Courses for registered Students या लिंकच्या सहाय्याने विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यास पदवी अभ्यासक्रमास (B.A., B.Com., B.Sc., B.Ed. इ.) देण्यात आलेला १६ अंकी PRN हाच पुढील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी कायम ठेवण्यात येणार असून पदवी स्तरावरील PRN च्या आधारे त्यांचे पदव्यूत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश होणार आहेत. या सर्व विद्यार्थ्यांची वैयक्तीक माहिती ही DU Portal वर पदव्यतूत्तर अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असणार आहे. परंतू सदरची माहिती ही अद्यावत नसल्याने या माहितीमध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मधील पदव्यूत्तर वर्गाच्या Online प्रवेश प्रक्रियेवेळी आपला स्वत:चा अलिकडील फोटो व सही पुन्हा Scan करुन Upload करावी. तसेच भ्रमणध्वनी क्रमांक,पत्ता इत्यादी वैयक्तिक माहितीसुध्दा अद्यायावत करणे बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या अर्जावर जसे प्रवेशअर्ज,पात्रता अर्ज,परीक्षा अर्ज,परीक्षा प्रवेश पत्र,गुणपत्रक यावर विद्यार्थ्याचा अलिकडचा फोटो व सही छापली जाईल तसेच वेळोवेळी पाठविण्यात येणारे SMS, e-mail इत्यादी ई-सुविधेचा लाभ प्रभावीपणे घेता येईल.

या संदर्भातील सविस्तर सादरीकरण हे विद्यार्थी सहाय्यता केंद्रामार्फत विद्यापीठ संकेतस्थळावर http://nmuj.digitaluniversity.ac उपलब्ध असून सदरची माहिती या सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

यासंदर्भातील अधिकच्या माहितीसाठी श्री. विनोद प्र.पाटील,प्र.संगणक केंद्र प्रमुख तथा संपर्क अधिकारी किंवा ई-सुविधा विद्यार्थी सहायता केंद्र (०२५७-२२५८४१८,२२५७३३६,२२५७३३७,२२५७३३८,२२५७२९३) यांचेशी संपर्क साधावा.

तरी महाविद्यालयांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे,ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
सही/***
**(डॉ.पी.पी. माहुलीकर )**
**विशेष कार्यकारी अधिकारी ,**
**महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ**

प्रत माहितीसाठी :-

१. मा.वित्त व लेखा अधिकारी,उमवि.,जळगाव.
२. मा.संचालक , परीक्षा व मूल्यमापन मंडळ ,उमवि,जळगाव
३. संगणक केंद्र प्रमुख,संगणक केंद्र (परीक्षा),उमवि,जळगाव
४. विशेष कार्य अधिकारी,मा. कुलगुरु कार्यालय,उमवि.,जळगाव.
५. सहायक कुलसचिव,प्रवेश व पात्रता विभाग,उमवि.,जळगाव.
६. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख,उमवि.,जळगाव.

*-*-*